महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक ३०/०७/२०२४

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शा.नि.क्र.मावज-२०२४/प्र.क्र.१४४/मावज-१, दिनांक २९ जुलै, २०२४.

**विषय** :- सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात राज्य माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाव्दारे " विशेष प्रसिध्दी मोहिम " राबविण्यासाठी माध्यम आराखडा तयार करण्यास व त्यासाठी येणाऱ्या रु.२७०,०५,००,०००/- इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

******

**परिपत्रक -**

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शा.नि.क्र.मावज-२०२४/प्र.क्र.१४४/मावज-१, दिनांक २९ जुलै, २०२४. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४०७२९१५००४०४४०७ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई (सस्नेह).
अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, मुंबई (सस्नेह)
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह).
अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था / प्रशिक्षण व खास पथके /आस्थापना /प्रशासन नियोजन व समन्वय /विशेष कृती /रा.रा.पो.बल /वाहतूक / फोर्स वन /आर्थिक गुन्हे /दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग , महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक (कायदा व सुव्यवस्था/आस्थापना/प्रशासन/सायबर सुरक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, मुंबई/मोटार परिवहन विभाग, पुणे/ महिला व बाल अत्याचार प्रतिबंध विभाग / नागरी हक्क संरक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई. नक्षल विरोधी अभियान,नागपूर.



Scanned with CamScanner

विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.
सर्व पोलीस अधीक्षक (गुन्हे / बिनतारी संदेश / लोहमार्गसह )
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्रे.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु./ प्रशासन / नि. व स./ धोरण), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे वरिष्ठ उपसहायक/ उपसहायक
सर्व कार्यासन अधिकारी, का.क्र.०१ ते ४४

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके मध्ये " वित्त व लेखा " या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे "विशेष प्रसिध्दी मोहिम" राबविण्यासाठी माध्यम आराखडा तयार करण्यास व त्यासाठी येणाऱ्या रु.२७०,०५,००,०००/- इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन निर्णय क्र. मावज-२०२४/प्र.क्र.१४४/मावज-१**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- २९ जुलै, २०२४

**वाचा :-** १) सा. प्र. वि. शासन निर्णय क्र. मावज-२०१८/प्र.क्र.२३९/३४, दि.२६ मार्च २०२०
२) सा. प्र. वि. शासन निर्णय क्र. मावज-२०२३/प्र.क्र.१८७/३४, दि.२३.११.२०२३.
३) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांचे पत्र क्र. वृत्तचित्र-२०२४-२५/मावज वि.प्र.मो./का-७/११८, दि. १२/०७/२०२४

**प्रस्तावना :-**

राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या लोकाभिमुख योजना, विकास प्रकल्प, विविध योजना, ध्येय धोरणे, महत्वाकांक्षी प्रकल्प, विकास कामे व लोककल्याणकारी योजनांची माहिती होण्यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत विविध प्रसार माध्यमांद्वारे शासकीय योजनांची प्रसिध्दी करण्याचे कार्य करण्यात येते. त्यानुषंगाने नुकत्याच विधीमंडळात मांडण्यात आलेल्या अर्थसंकल्पामध्ये विविध लोकाभिमुख योजना राबविण्याचा निर्णय शासनाद्वारे घेण्यात आला आहे. त्यामध्ये मुख्यमंत्री-बहिण लाडकी योजना, मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना आदी विविध योजनांचा समावेश असून या योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रभावी प्रसिध्दी मोहिम राबविण्याचे निर्देश मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिले आहेत. त्यास अनुसरुन, विशेष प्रसिध्दी मोहिमेंतर्गत वर्तमानपत्रे, दूरचित्रवाणी वाहिन्या, रेडिओ, बाह्य व अन्य माध्यमे, समाज माध्यमे, डिजिटल माध्यमे यासह विविध नवमाध्यमांद्वारे शासकीय योजनांची माहिती व जनजागृती करण्यासाठी अंदाजित खर्चाचा माध्यम आराखडा माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने संदर्भादिन दिनांक १२/०७/२०२४ च्या पत्रान्वये सादर केला आहे. सदर माध्यम आराखड्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षामध्ये शासनाच्या विविध योजनांची व्यापक प्रचार व प्रसिध्दी करण्यासाठी, आखण्यात आलेल्या विशेष प्रसिध्दी मोहिमेकरीता तयार केलेल्या माध्यम आराखडयास तसेच तो राबविण्यासाठी येणाऱ्या अंदाजे रु.२७०,०५,००,०००/-(अक्षरी रुपये दोनशे सत्तर कोटी पाच लक्ष फक्त) इतक्या खर्चास या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

या विशेष प्रसिध्दी मोहिमेसाठी तयार करण्यात आलेला माध्यम आराखडा व त्यासाठी येणा-या अंदाजित खर्चाचा तपशील पुढील नमूद विवरणपत्राप्रमाणे राहील:-

| अ.क्र. | प्रसिद्धी माध्यमे | तपशील | अंदाजित रक्कम<br>(सर्व करांसहित) |
|---|---|---|---|
| १ | शासकीय संदेशाची निर्मिती / संदर्भ साहित्याची निर्मिती करणे | मुद्रित (प्रिंट), दृकश्राव्य, TVC, सेलिब्रिटीसह TVC, ऑडिओ, जिंगल्स / स्पॉट, लघुपट, माहितीपट आदी | रु,३,००,००,०००/- |
| २ | राज्यातील आणि राज्याबाहेरील महत्त्वांच्या महानगरांमध्ये मुद्रित माध्यमांद्वारे प्रसिद्धी | मुद्रित (प्रिंट) वर्तमानपत्रे | रु.४०,००,००,०००/ |
| ३ | इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे प्रसिद्धी | १. दूरदर्शन<br>२. आकाशवाणी वाहिन्या<br>३. खाजगीवृत्त दूरचित्रवाणी वाहिन्या<br>४. खाजगी एफ.एम. रेडिओ,<br>५. कम्युनिटी रेडिओ वाहिन्या,<br>६. सिनेमागृहे<br>७. एस.टी. डेपोमधून ऑडिओ जिंगल<br>८. स्थानिक केबल वाहिन्या<br>९. लोकलमधून ऑडिओद्वारे प्रसिद्धी<br>१०. सुपर मार्टमधून ऑडिओद्वारे प्रसिद्धी<br>११. रेल्वे स्थानकांवरुन ऑडिओद्वारे प्रसिद्धी<br>आदीमाध्यमे | रु.३९,७०,००,०००/- |
| ४ | बाह्यमाध्यमांद्वारे प्रसिद्धी | १. मा. व ज. आणि खाजगी होर्डिंग<br>२. डिजीटल फ्लेक्स बॅनर<br>३. एस.टी. बस स्टॅन्ड होर्डिंग्ज<br>४. एस.टी. बसेस साईड व बॅकपॅनेल | रु.१३६,३५,००,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ५. एस.टी. स्थानकांवरुन एलईडी / एलसीडी / ईएसबी स्क्रीन्स<br><br>६. एस.टी.बसमधील सिट बॅक पॅनेल<br><br>७. बेस्ट बसेस रॅप<br><br>८. बेस्ट बस शेल्टर (बीक्युएस)<br><br>९. बेस्ट स्ट्रिट लाईट बॅकलिट पोल्स<br><br>१०. महानगरपालिकांच्या सिटी बस रॅप आणि साईड पॅनेल<br><br>११. महानगरपालिकांच्या सिटी बस शेल्टर (बीक्युएस)<br><br>१२. रेल्वे रॅप आणि पॅनेल<br><br>१३. रेल्वे स्टेशन्स एलईडी / एलसीडी स्क्रीन<br><br>१४. मेट्रो रेल्वे स्टेशन्स<br><br>१५. मेट्रो रेल्वे रॅप / पॅनेल<br><br>१६. डिजीटल वॉल पेंटीग<br><br>१७. विमानतळावरुन प्रसिद्धी<br><br>(होर्डिंग, एलईडी, डिस्प्ले बोर्ड,युनिपोल)<br><br>मुंबई / दिल्ली<br><br>१८.विमानतळावरुन प्रसिद्धी (होर्डिंग, एलईडी, डिस्प्ले बोर्ड, युनिपोल) नागपूर<br><br>१९. विमानतळ टॅक्सी / कॅब<br><br>२०. ऑटो हुड / टॅक्सीवरुन प्रसिद्धी<br><br>२१. गृहसंकुलामधून एलईडी / एलसीडी<br><br>आदीमाध्यमे | |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | समाज माध्यमे / डिजीटल माध्यमांद्वारे प्रसिद्धी | १.सोशलमिडीया, डिजीटलमिडीया,<br>२. एस.एम.एस. आदीमाध्यमे<br>३. बल्क ओबीडी कॉल्स,<br>४. व्हॉटस् ॲप चॅटबॉट<br>५. व्हॉटस् ॲप मेसेजिंग / ब्रॉडकास्टींग | रु.५१,००,००,०००/- |
| | | | **रु.२७०,०५,००,०००/-** |

**३.** वरील माध्यम आराखड्यानुसार राज्य शासनाने घेतलेल्या खालील लोकाभिमुख निर्णयांची विविध प्रसिध्दी माध्यमांद्वारे प्रसिध्दी करण्यात येईल.

**योजना / आराखडा / कार्यक्रम / विषय:** - मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण, शासकीय दस्तावेजांमध्ये आईच्या नावाचा समावेश, शुभमंगल सामूहिक विवाह योजनेस वाढवलेले अनुदान, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना, लखपती दिदी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्ट अप योजना, मुलींना मोफत व्यावसायिक उच्च शिक्षण, ई-पंचनामा प्रणाली, गाव तेथे गोदाम, मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना, कृषी शेतकरी विमा, पायाभूत सुविधा (एमटीएचएल, कोस्टल रोड, मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, ग्रीनफिल्ड कोकण द्रुतगती मार्ग, विरार ते अलिबाग बहुउद्देशिय वाहतूक मार्गिका प्रकल्प), उद्योग, नमो शेतकरी महासन्मान निधी, दुग्ध योजना, सिंचन, महाआवास योजना, रोजगार हमी योजना, ग्रामीण जीवनोन्नती अभियान (स्वयं-सहायता गट), आरोग्य (महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना), हर घर जल, शिक्षण (मुख्यमंत्री-माझी शाळा सुंदर शाळा), मराठी भाषा विद्यापीठ, पर्यटन, राष्ट्रीय स्मारके (हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्मारक), शासकीय वसतीगृहे, आदिवासी आश्रमशाळा, शिधावाटप, ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध योजना, मराठा आरक्षण, सुरक्षा, रोजगार, सागरी सुरक्षा, शिक्षण, सामाजिक न्याय इत्यादी विविध विषयांच्या योजनांवर आधारित जाहिरातींची निर्मिती करुन विविध प्रसिद्धी माध्यमांद्वारे प्रसिद्ध / प्रसारित करण्यात येतील.

**विशेष प्रसिध्दी मोहिमें अंतर्गत द्यावयाचा अपेक्षित संदेश :-** सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी शासनामार्फत राबविण्यात आलेल्या योजनांची माहिती देणे उपक्रम, विकासकामे व लोककल्याणकारी योजनांची / शासकीय संदेशाची व्यापक प्रसिद्धी व प्रसार करण्याचे प्रस्तावित आहे.

**४.** माध्यम आराखड्याचे वेळापत्रक माहे जुलै, २०२४ ते ३१ मार्च, २०२५ पर्यत वैध राहील. **माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने खालील अटीनुसार उक्त माध्यम आराखड्याची अंमलबजावणी करावी.**

(i) खर्च करण्यात येणाऱ्या सर्व बाबी माध्यम आराखड्यात अंतर्भूत असाव्यात.

(ii) माध्यम आराखड्यात नमूद केलेल्या वित्तीय मर्यादेमध्ये खर्च असावा. याकरिता कोणताही अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.

(iii) शासनाने वेळोवेळी जाहिरातीबाबत विहित केलेल्या कार्यपद्धतीचे पालन करण्यात यावे.

(iv) प्रस्तावित कामांसाठी दर/निवड करावयाच्या संस्था याबाबत सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय तसेच, ई-निविदा मागविण्याबाबतच्या सर्वसाधारण निर्देशाचे व अनुदेशाचे पालन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडून करण्यात यावे.

(v) प्रस्तावित माध्यम आराखडयाचा खर्च करताना माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय व वित्त विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतुदी तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णय दि. ०१/१२/२०१६ मध्ये नमूद कार्यपध्दतीचा अवलंब करावा.

(vi) सदर खर्च सा.प्र.वि. शासन निर्णय दिनांक २६/०३/२०२० मध्ये नमुद वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत करावा.

(vii) विशेष प्रसिध्दी मोहिम राबविण्यासाठी येणाऱ्या खर्चाची दर्शविण्यात आलेली रक्कम अंदाजित असून एखादया माध्यमादवारे प्रसिध्दी न झाल्यास सदर माध्यमाची रक्कम उपरोक्त तक्त्यामधील इतर कोणत्याही माध्यमांमध्ये आवश्यकतेनुसार वापरण्यास तसेच एखादया माध्यमात बदल करण्यास अथवा एखादे नवीन माध्यम समाविष्ट (अंदाजित खर्चाच्या एकूण मर्यादेत) करण्यास, तसेच वरील माध्यम आराखडयानुसार कार्यवाही करताना अनुभव आणि क्षमता लक्षात घेवून माध्यमाची निवड, माध्यमाचा वापराचा आकार, जाहिरातीचा कालावधी आणि वारंवारिता ठरविण्याबाबतचे अधिकार महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांना राहतील.

(viii) उक्त संदर्भ वाचा क्र.२ येथील शासन निर्णय क्र.मावज-२०२३/प्र.क्र.१८७/का-३४, दि.२३ नोव्हेंबर, २०२३ अन्वये राज्य शासनाच्या विविध विभागांच्या योजना, उपक्रम कार्यक्रमांच्या व अभियानांच्या प्रसिद्धी आणि जाहिरात विषयक कार्ये पार पाडण्यासाठी जाहिरात संस्थांची सूची तयार करण्यात आली आहे. या जाहिरात संस्थांच्या सूचीमधील संस्थांकडून विहित कार्यपद्धतीचा अवलंब करुन संस्थांची निवड करण्यात यावी. निवड करण्यात आलेल्या संस्थांकडून प्रस्तावित शासकीय संदेशांची निर्मिती करण्यात यावी.

(ix) नवमाध्यमे इत्यादी जाहिरातींचे प्रसारण/प्रसिध्दी करताना माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडे उपलब्ध असलेल्या (DGIPR) दराने त्याचप्रमाणे वर्तमानपत्रांद्वारे (प्रिंट) तसेच दृकश्राव्य, श्राव्य व इतर बाह्य प्रसिद्धी माध्यमांद्वारे करावयची प्रसिध्दी सीबीसी (DAVP) च्या दराने करण्यात यावी.

**५.** प्रस्तुतचा खर्च सामान्य प्रशासन विभाग, मागणी क्र.-ए-६-२२२०-माहिती व प्रसिध्दी, ६०- इतर, १०१ जाहिरात व दृक प्रसिध्दी (००) (०३) शासकीय योजनांची विशेष प्रसिध्दी मोहीम (योजनांतर्गत), २६ जाहिरात व प्रसिध्दी (संगणक सांकेतांक क्र.२२२०११७५) या लेखाशिर्षांतर्गत सन २०२४-२५ मधील मंजूर अनुदानातून बीम्स प्रणालीवर उपलबध तरतुदीच्या मर्यादेत आवश्यक व महत्त्वाच्या बाबींवर करण्यात यावा. सदरहू खर्च त्या त्या प्रयोजनांसाठी उपलब्ध असलेलया तरतुदीमधूनच भागविण्यात यावा. याकरिता उक्त माध्यम आराखड्यात नमुद विविध प्रसिध्दी माध्यमाद्वारे कोणताही अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.

**६.** सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३६०/का-१४४३, दि.४/०७/२०२४ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ४३६, व्यय-४, दि.२२/०७/२०२४ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

**७.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यांत आला असून त्याचा संकेतांक २०२४०७२९१५००४०४४०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

YUVRAJ MANOHAR SOREGAONKAR

Digitally signed by YUVRAJ MANOHAR SOREGAONKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=f7ccdb18d954bb814d3cc3c92ab0c128e19f5f95c724abaf0a38fa1a74dec734, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1A45294B68B97E03C570AFA8F17C64F6DFE2A4A241DD2AFF2322FEEC22B389F5, cn=YUVRAJ MANOHAR SOREGAONKAR
Date: 2024.07.29 15:16:19 +05'30'

**( युवराज सोरेगांवकर )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव.
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६. मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य.
८. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
९. मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१०. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
११. मा.मुख्य सचिव यांचे सहसचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१२. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
१३. महालेखापाल, १/२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरीक्षा), मुंबई, नागपूर,
१४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
१५. सहसचिव, वित्त विभाग (कार्या-व्यय-४)
१६. सहसचिव, नियोजन विभाग (कार्या-१४४३)
१७. उपसंचालक (लेखा), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
१८.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
१९. लेखाधिकारी (आहरण व संवितरण), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
२०. निवडनस्ती (मावज-१), सामान्य प्रशासन विभाग.

२१. मंत्रालयाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख.

२२. भारतीय जनता पक्ष, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.कुटीर क्र.१, योगक्षेमसमोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-४०० ०२०.

२३. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस(इं.) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-४०० ०२५.

२४. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष, ठाकरसी हाऊस, जे.एन.हेरेडिया मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई-४०० ०३८.

२५. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-४०० ०२८.

२६. बहुजन समाज पक्ष, प्रदेश सचिव, महाराष्ट्र राज्य, बी.एस.जी.भवन, भूखंड क्र. ८३-ए, कलेक्टर कॉलनी, चेंबूर, मुंबई-४०० ०७४.

२७. भारतीय कम्युनिस्ट पक्ष, महाराष्ट्र समिती, ३१४, राजभवन, एस.व्ही.पटेल मार्ग,मुंबई -४०० ००४.

२८. भारतीय कम्युनिस्ट (मार्क्सवादी) पक्ष, महाराष्ट्र समिती, जनशक्ती सभागृह, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई-४०० ०१३.

२९. महाराष्ट्र नवनिर्माण सेना, राजगड, मातोश्री टॉवर, शिवाजी पार्क, दादर, मुंबई-४०० ०२८.